# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 September 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- शांघाय सहकार्य संघटनेच्या जाहीरनाम्यात भारताच्या प्रादेशिक सहकार्य आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या योगदानाची विशेष दखल; पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध
- मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतचा शासन आदेश राज्य सरकारच्या विचाराधीन
- मराठा आरक्षण आंदोलकांना मुंबईतले सर्व रस्ते मोकळे करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश
- ज्येष्ठागौरी पूजनाचा सोहळा सर्वत्र पारंपरिक पद्धतीने साजरा–आज गौरी विसर्जन

आणि

- राज्याच्या बहुतांश भागाला दोन दिवस पावसाचा यलो अलर्ट

****

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर तिएनजीन जाहीरनामा काल प्रसिद्ध झाला. त्यात भारताच्या प्रादेशिक सहकार्य आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या योगदानाची दखल घेण्यात आली आहे. तसंच यात दहशतवादाविरोधात स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. चीनमधे तिएनजीन इथं झालेल्या या बैठकीत, शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला. मे २०२५ मधे शांघाय सहकार्य संघटनेचा थिंक टॅंक फोरम भारतात यशस्वीपणे घेण्यात आला, त्याबद्दल सदस्य देशांनी भारताचं अभिनंदन केलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात काल चीनमधे तिएनजीन इथं द्विपक्षीय चर्चा झाली. ऊर्जा, आर्थिक क्षेत्रात द्विपक्षीय संबंधामुळे सातत्याने होणाऱ्या प्रगतीबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. दरम्यान आपला चीन दौरा आटोपून पंतप्रधान काल सायंकाळी नवी दिल्लीत पोहोचले.

****

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याकरता हैदराबाद आणि सातारा गॅझेटियरच्या अंमलबजावणीच्या संदर्भात शासन आदेश काढण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षणाच्या संदर्भातल्या मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक मुंबईत झाली. त्यात यासंदर्भातल्या मसुद्यावर चर्चा झाल्याची माहिती समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी वार्ताहरांना दिली. महाधिवक्ता विरेंद्र सराफ यांनी या मसुद्याला मंजुरी दिल्यानंतर पुढे कार्यवाही करणार असल्याचं, विखे-पाटील यांनी सांगितलं. यासंदर्भात अधिक माहिती देतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले…

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

ज्या हैदराबाद गॅझिटियरच्या आधारे मनोज जरांगे ओबीसीमधून आरक्षणाची मागणी करत आहेत, त्या गॅझिटियरमधे मराठा आणि कुणबी अशा दोन जातींची स्वतंत्र नोंद आहे. त्यामुळे मराठा हे कुणबी नाहीत हे सिद्ध होतं, असा दावा ओबीसी नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे. ओबीसी नेत्यांच्या बैठकीनंतर ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. मराठा ही सामाजिकदृष्ट्या संपन्न आणि समृद्ध जात असल्याचं सांगत, सर्वोच्च न्यायालयाने मराठा जातीचा इतर मागासवर्गात समावेश नाकारला होता. त्यामुळे मराठा समाजाचा ओबीसीत प्रवेश होऊ शकत नाही, असं भुजबळ यांनी नमूद केलं. केंद्र सरकारने खुल्या प्रवर्गातल्या जातींसाठी ईडब्ल्यूएसचं दहा टक्के आरक्षण जाहीर केलं होतं. त्याचा सर्वात जास्त फायदा मराठा समाजालाच झाला. त्यानंतरही त्यांना ओबीसीतून आरक्षण हवं असल्याची टीका भुजबळ यांनी केली.

****

मराठा समाजातील तरुणांची माथी भडकावून राजकीय स्वार्थ साधण्याचं राजकारण विरोधकांकडून केले जात असल्याची घणाघाती टीका अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली आहे. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. माजी मुख्यमंत्री शरद पवार यांनी बंद केलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात पुनर्स्थापना केली. या महामंडळाच्या माध्यमातून केलेल्या कामकाजाचा पाटील यांनी आढावा घेतला. ते म्हणाले...

**बाईट – अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील**

महायुती सरकार मराठा समाजाच्या मागण्यांवर तोडगा काढेल, तोपर्यंत शांततेत आंदोलन करावं, असं आवाहन त्यांनी केलं. मराठा आरक्षण विषयावर पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी आणि त्यावेळी सत्तेत असलेल्या पक्षांनी आत्मचिंतन करण्याची गरजही नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केली...

**बाईट – अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील**

****

आझाद मैदानाबाहेर मराठा आंदोलक असल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयात काल विशेष सुनावणी झाली. यावेळी न्यायालयानं आंदोलकांनी सर्व रस्ते मोकळे करावेत आणि परिस्थिती सामान्य करावी असे आदेश दिले. मुंबईत आणखी मराठा आंदोलक येणार नाहीत तसंच गरजेनुसार मनोज जरांगे यांना वैद्यकीय मदत मिळेल याची खबरदारी घेण्याचे आदेशही न्यायालयानं सरकारला दिले. आंदोलकांसाठी वानखेडे किंवा ब्रेबॉर्न स्टेडियम खुले करुन देण्याची जरांगे यांच्या वकीलांची मागणी न्यायालयानं फेटाळून लावली.

**

जरांगे पाटील यांनी, आंदोलकांना न्यायालयाच्या आदेशाचं पालन करावं, रस्त्यावर फिरणं थांबवावं, आणि मुंबईकरांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्याचं आवाहन केलं आहे.

****

पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. वाहनांसाठी उपयुक्त नसलेलं इंधन वापरण्यासाठी बाध्य केलं जात असल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा, सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या पीठाने फेटाळून लावला आहे.

****

ज्येष्ठागौरी पूजनाचा सोहळा काल सर्वत्र पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. परवा स्थापन झालेल्या गौरींना काल दुपारनंतर घरोघरी पंचपक्वान्नांसह सोळा भाज्यांचा सुग्रास नैवेद्य अर्पण करून त्यांचं पूजन करण्यात आलं. आज या तीन दिवसीय सोहळ्याची गौरी विसर्जनाने सांगता होणार आहे.

****

नवसाला पावणारा गणपती अशी ओळख असलेला हिंगोलीच्या विघ्नहर्ता चिंतामणी गणपती संस्थांनच्या वतीने यावर्षी दीड लाख नवसाचे मोदक वाटप करण्यात येणार आहेत. याबाबत अधिक माहिती देत आहेत, आमचे वार्ताहर...

> ***दरवर्षी देशभरातून तीन ते चार भाविक या ठिकाणी दर्शनासाठी व नवस पूर्ण करण्यासाठी येतात. महाराष्ट्रासह, दिल्ली, गुजरात, राजस्थान, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यातील भाविकांचीही येथे मोठी संख्या असते. गणेशोत्सवानिमित्त येथे दहा दिवस धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. अनंतचतुर्दशीच्या दिवशी ५ सप्टेंबर रोजी कयाधू नदीवरून कावड आणली जाईल. पहाटे चार वाजता बाप्पाला महाभिषेक केल्यानंतर मोदकोत्सवाला सुरुवात केली जाणार असल्याचे संस्थांच्या वतीने कळविण्यात आले आहे.***

**आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.**

आखाडा बाळापूर इथला बालकलावंत शिवार्थ दारव्हेकर याने श्री गणेशासमोर भारतीय सैन्य दलाने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' ची चित्रकथा साकारली आहे. हा देखावा पाहण्यासाठी गणेश भक्तांची मोठी रीघ लागली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा योगासन क्रीडा संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या वरिष्ठ गटातील राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत धाराशिव जिल्हा योगासन संघटनेच्या योग अभ्यासकांनी दोन सुवर्ण तसंच एक कांस्यपदक पटकावलं. २८ ते ३५ वर्ष महिला वयोगटात सीमा चौरे यांनी लेग बॅलन्स प्रकारात तर ३५ ते ४५ वर्ष पुरुष वयोगटात सतीश साबळे यांनी ट्विस्टिंग प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. तर याच वयोगटात सुपैन प्रकारात परमेश्वर चौरे यांनी कांस्यपदक पटकावलं आहे.
छत्तीसगड इथं होणाऱ्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी सीमा चौरे आणि सतीश साबळे यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

****

जालना इथल्या डॉ. प्रदीप सोनवणे रुग्णालयाला जैव वैद्यकीय कचरा उघड्यावर टाकल्याप्रकरणी पाच हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. असा कचरा उघड्यावर टाकू नये, अन्यथा कठोर कारवाईचा इशारा जालना महानगरपालिकेनं दिला आहे.

****

यंदाच्या खरीप हंगामात मे ते ऑगस्ट या चारही महिन्यात नांदेड जिल्ह्यात ९३ पैकी ८८ मंडळात अतिवृष्टी झाल्यामुळे पिकांचं नुकसान झालं आहे. जिल्ह्याला भरीव आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी खासदार अशोक चव्हाण यांनी केली आहे.
विभागात लातूर जिल्ह्याच्या रेणापूर प्रकल्पातून ६२३ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद या वेगाने, हिंगोली जिल्ह्यात सिद्धेश्वर धरणातून ११ हजार ५१४, तर जायकवाडी धरणातून १४ हजार ६७२ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद या वेगाने विसर्ग सुरु आहे.

****

हवामान

कोकण, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात हवामान विभागाने आज आणि उद्या यलो अलर्ट दिला आहे. मराठवाड्यात सर्वच जिल्ह्यात आज पावसाची शक्यता आहे. विदर्भातल्या काही जिल्ह्यांना आज आणि उद्या तर कोकणात उद्या ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

****